# निशाणी क्र. २१ वरील आदेश

प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी क्र. २ कथन करतात की, प्रतिवादी क्र. २ यांना दिनांक ०१/०७/२०२४ रोजी समन्सची बजावणी झाली आहे. प्रतिवादीस दिनांक ०१/१०/२०२४ पर्यंत कैफियत व म्हणणे दाखल करणे आवश्यक होते परंतु महत्वाची कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करणे शक्य झाले नाही. कैफियत दाखल करण्यास ४१ दिवसांचा विलंब झाला आहे. तरी विलंब माफ करुन प्रतिवादी यांची दाव्यासंदर्भातील कैफियत व तुर्तातुर्त मनाई अर्जावरील म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे अशी न्यायालयास नम्र विनंती करण्यात येत आहे.प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ प्रतिवादी यांनी नि.क्र.२२ वर प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

२. सदर अर्जावर लेखी म्हणणे देत वादी कथन करतात की, प्रतिवादीचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. अर्ज दाखल करण्यास १३४ दिवसाचा विलंब झाला आहे. सबब प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा आणि मंजुर करणेचा झाल्यास वादीस रु. १०,०००/– इतकी कॉस्ट मिळावी अशी न्यायालयास विनंती करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी यांनी दाखल केलेला अर्ज आणि त्यावरील वादी यांचे तर्फे म्हणणे विचारात घेतले. दोन्ही पक्षांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांना समन्स लागू झाल्यानंतर तीस दिवसांमध्ये दाव्यास कैफियत देणे बंधनकारक होते. परंतु प्रतिवादी यांना वारंवार संधी देवून देखील त्यांनी मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल केलेली नाही. परंतु दाव्याचे स्वरुप पाहता दावा हा गुणदोषांवर निकाली होणेकरीता दोन्ही पक्षांचे म्हणणे विचारात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार करता प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरणारे आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. २ यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब ३००/– रुपये इतक्या कॉस्टसहीत माफ करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी यांनी वर नमूद कॉस्ट वादी यांना द्यावी असे प्रतिवादींना आदेशित करण्यात येत आहे.

४. सदर कॉस्ट वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात येईल.

सही/-

**(श्रीमती गायत्री एस. पाटील)**

दिनांकः २८/११/२०२४

३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बार्शी. जि. सोलापूर.

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **S.V. Kokate (Grade III)** |
| Name of the court | : | **Smt. Gayatri S. Patil** |
| | | **3rd Jt. CJJD & JMFC,** |
| | | Barshi, Dist. Solapur. |
| Judgment/order declared on | : | **28/11/2024** |
| Judgment/order signed by Presiding officer | : | **28/11/2024** |
| Judgment/order uploaded on | : | **29/11/2024** |